# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका क्षेत्रात कोविड व्हॅक्सिन अमृत महोत्सव अंतर्गत सर्व शासकीय कोविड लसीकरण केंद्रावर १८ वर्ष ते ५९ वर्ष या वयोगटातील सर्व नागरीकांना प्रिकॉशन डोस देण्यात यावे, तसेच उद्दिष्टे ७५ दिवसात पूर्ण करण्याबाबतचे निर्देश मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी दिले आहे.

**{आरोग्य विभाग}**

नागपूर महानगरपालिका अंतर्गत १० झोनचे ७५ दिवसांकरीता १८ वर्ष ते ५९ वर्ष या वयोगटातील प्रिकॉशन डोसचे एकूण उद्दिष्ट ११,१३,००३ लाभार्थी होते. त्यापैकी २०,७९२ लाभार्थ्यांना प्रिकॉशन डोस देण्यात आलेले असून १०,९२,२११ लाभार्थी शिल्लक आहेत. प्रिकॉशन डोसचे उद्दिष्टे ७५ दिवसांत पूर्ण करावयाचे असल्यामुळे दररोज एकूण १४,५६३ प्रिकॉशन डोस देण्याकरीता एकूण १४६ लसीकरण टीम कार्यरत असणे आवश्यक आहे.

प्रिकॉशन डोसचे उद्दिष्टे ७५ दिवसांत पूर्ण करण्याकरीता नागपूर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत मनुष्यबळा व्यतिरिक्त १०० (ए.एन.एम. किंवा जी.एन.एम.) पुढील ७५ दिवसाकरीता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त करण्याची मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे.

राष्ट्रीय नागरी अभियान अंतर्गत कार्यरत ए.एन.एम. रु.१८,०००/- प्रति महा मानधन मंजूर आहे. त्यानुसार अतिरिक्त मनुष्यबळ १०० (ए.एन.एम. किंवा जी.एन.एम.) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केल्यास त्यांना खालील प्रमाणे मानधन देय राहील.

तसेच कोविड लसीकरणाकरीता मोबीलायझर म्हणून नागपूर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत आशा स्वयंसेविका यांना नागपूर महानगरपालिका निधीतून रु.१,०००/- प्रति महा प्रमाणे ७५ दिवसांकरीता मोबदला देण्याबाबत मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे.

| पदाचे नाव | विवरण | प्रति महा मानधन | ७५ दिवसांकरीता लागणारे मानधन (३० सप्टेंबर पर्यंत) |
|---|---|---|---|
| ए.एन.एम. | १०० | रु.१८,००,०००/- | रु.४५,००,०००/- |
| आशा स्वयंसेविका | ९५५ | रु.९,५५,०००/- | रु.२३,८७,५००/- |
| एकूण | १०५५ | रु. २७,५५,०००/- | रु.६८,८७,५००/- |

उपरोक्त प्रमाणे कोविड व्हॅक्सिन अमृत महोत्सव राबविण्याकरीता १०० (ए.एन.एम. किंवा जी.एन.एम.)तसेच ९९५ आशा स्वयंसेविका यांना मोबदला पुढील ७५ दिवसाकरीता देण्याकरीता एकूण निधी रु.६८,८७,५००/- खर्च अपेक्षित आहे. हा खर्च वैद्यकीय आरोग्य विभागातील आस्थापना बजेट हेड क्र. A२३१०१२१०००२ यातून करण्याचे प्रस्तावित असून, उक्तप्रमाणे विषयास व खर्चास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिपः सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 76/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 17/08/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रात कोविड व्हॅक्सिन अमृत महोत्सव अंतर्गत सर्व शासकीय कोविड लसीकरण केंद्रावर १८ वर्ष ते ५९ वर्ष या वयोगटातील सर्व नागरीकांना प्रिकॉशन डोस देण्यात

यावे, तसेच उद्दिष्टे ७५ दिवसात पूर्ण करण्याबाबतचे निर्देश मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी दिले आहे.

नागपूर महानगरपालिका अंतर्गत १० झोनचे ७५ दिवसांकरीता १८ वर्ष ते ५९ वर्ष या वयोगटातील प्रिकॉशन डोसचे एकूण उद्दिष्ट ११,१३,००३ लाभार्थी होते. त्यापैकी २०,७९२ लाभार्थ्यांना प्रिकॉशन डोस देण्यात आलेले असून १०,९२,२११ लाभार्थी शिल्लक आहेत. प्रिकॉशन डोसचे उद्दिष्टे ७५ दिवसांत पूर्ण करावयाचे असल्यामुळे दररोज एकूण १४,५६३ प्रिकॉशन डोस देण्याकरीता एकूण १४६ लसीकरण टीम कार्यरत असणे आवश्यक आहे.

प्रिकॉशन डोसचे उद्दिष्टे ७५ दिवसांत पूर्ण करण्याकरीता नागपूर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत मनुष्यबळा व्यतिरिक्त १०० (ए.एन.एम. किंवा जी.एन.एम.) पुढील ७५ दिवसाकरीता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त करण्याची मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे.

राष्ट्रीय नागरी अभियान अंतर्गत कार्यरत ए.एन.एम. रु.१८,०००/- प्रति महा मानधन मंजूर आहे. त्यानुसार अतिरिक्त मनुष्यबळ १०० (ए.एन.एम. किंवा जी.एन.एम.) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केल्यास त्यांना खालील प्रमाणे मानधन देय राहील.

तसेच कोविड लसीकरणाकरीता मोबीलायझर म्हणून नागपूर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत आशा स्वयंसेविका यांना नागपूर महानगरपालिका निधीतून रु.१,०००/- प्रति महा प्रमाणे ७५ दिवसांकरीता मोबदला देण्याबाबत मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे.

| पदाचे नाव | विवरण | प्रति महा मानधन | ७५ दिवसांकरीता लागणारे मानधन (३० सप्टेंबर पर्यंत) |
|---|---|---|---|
| ए.एन.एम. | १०० | रु.१८,००,०००/- | रु.४५,००,०००/- |
| आशा स्वयंसेविका | ९५५ | रु.९,५५,०००/- | रु.२३,८७,५००/- |
| एकूण | १०५५ | रु. २७,५५,०००/- | रु.६८,८७,५००/- |

उपरोक्त प्रमाणे□कोविड व्हॅक्सिन अमृत महोत्सव□राबविण्याकरीता १०० (ए.एन.एम. किंवा जी.एन.एम.)तसेच ९९५ आशा स्वयंसेविका यांना मोबदला पुढील ७५ दिवसाकरीता देण्याकरीता एकूण निधी रु.६८,८७,५००/- खर्च अपेक्षित आहे. हा खर्च वैद्यकीय आरोग्य विभागातील आस्थापना बजेट हेड क्र. A२३१०१२१०००२ यातून करण्याचे प्रस्तावित असून, उक्तप्रमाणे विषयास व खर्चास मान्यता देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**